भारतीय जनता पार्टी - शिवसेना युती

१, जलाराम नगर, वल्लभबाग लेन, गांधी मार्केट समोर, घाटकोपर (पूर्व),
मुंबई - ४०० ०७४ टेलिफोन : २५१४ ९९७८, २५१४ ७८८९

कृपया प्रसिद्धीसाठी दि.८.०४.२००९

## ‘किरीट सोमैया यांचे नामांकन पत्र सादर‘

भाजपा-शिवसेना युतीचे ईशान्य मुंबईतील उमेदवार डॉ.किरिट सोमैया यांनी आज मुलुंड येथे तहसीलदार ऑफिस मध्ये लोकसभा निवडणूकीसाठी आपले नामांकन पत्र सादर केले.

यावेळी त्यांचे सोबत शिवसेना नेते व माजी मंत्री श्री लीलाधर डाके, मुंबई भाजपाचे अध्यक्ष आ.गोपाळ शेट्टी, मुलुंडचे आमदार सरदार तारासिंह व शिवसेना विभाग प्रमुख श्री दत्तराम गुजर उपस्थित होते.

नामांकन पत्र सादर केल्यानंतर श्री सोमैया यांनी मुलुंड (प) येथील पक्षाचे नवे निवडणूक कार्यालय तसेच प्राचारासाठी तयार केलेल्या “जनसुरक्षा रथाचे“ उद्‌घाटन केले.

या नंतर जमलेल्या हजारो कार्यकर्त्यांना संबोधित करताना श्री सोमैया यांनी सरकार वर महागाई रोकण्यात असमर्थ ठरल्याबद्दल टिका केली. साखरेचे उदाहरण देऊन सोमैया म्हणाले ऑक्टोबर २००८ मध्ये रु.१८.५०/- प्रति किलो असणारी साखर मार्च २००९ मध्ये रु.२७/- प्रति किलो येवढी महागली आहे.

साखर सम्राट व त्यांचे उमेदवार यांना याबाबत जनतेला उत्तर द्यावे लागेल.

या प्रसंगी बोलतांना आ.प्रकाश महेता यांनी काँग्रेसचे वर्तमान खासदार लढाई सोडून मतदार संघातून पळून गेले असे सांगून हवा भाजपा-शिवसेना युतीच्या बाजुने वाहत असल्याचे हे प्रतीक आहे असे सांगितले.

सरदार तारासिंह यांनी किरीट सोमैया यांचा विजय निश्चित आहे केवळ मताधिक्य किती असेल हे पहायचे आहे असे सांगितले.

एका महत्वाच्या घटनेत राष्ट्रीय रिपब्लीकन पार्टी ने श्री किरीट सोमैया यांना पाठींबा जाहीर केला आहे.

दयानंद नेने
९००४०२८५७५

